Jagdamba Education Society's

Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

* Central Library *

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 04/02/2025**

# Activity Name: Day Special

# दिन विशेष

## News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## मराठी कोशकार, लेखक चिं. ग. कर्वे

चिंतामणी गणेश कर्वे हे मराठी कोशकार व लेखक होते. त्यांचा जन्म ४ फेब्रुवारी १८९४ रोजी वडोदरा या ठिकाणी झाला. त्यांचे शिक्षण पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन महाविद्यालयात झाले. १९१७ मध्ये ते गणित विषय घेऊन पदवीधर झाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ज्ञानकोशकार केतकरांचे सहाय्यक म्हणून त्यांनी काम केले. तसेच केतकरांच्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या कार्यात त्यांनी प्रचंड मदत केली. १९२८ च्या सुमारास त्यांनी महाराष्ट्रीय कोश मंडळाची स्थापना केली. सुलभ विश्वकोशाच्या रचनेतही त्यांचा सहभाग होता. याशिवाय महाराष्ट्रीय शब्दकोश, महाराष्ट्र वाक्य संप्रदाय कोश, शास्त्रीय परिभाषा कोश अशा अनेक कोशांच्या रचनेत त्यांनी कार्य केले.

त्यांनी 'मानवी संस्कृतीचा इतिहास', 'मराठी साहित्यातील उपेक्षित मानकरी', 'कोशकार केतकर', 'प्राच्य आणि पाश्चात्य नीतिध्येये', 'आनंदीबाई पेशवे आदी ग्रंथांसह विविध नियतकालिकांतून संस्कृती, इतिहास, साहित्य भाषा या विषयांवर ४०० हून अधिक लेख लिहिले आहेत. याखेरीज 'पेशवेकालीन स्त्रियांची लहान लहान चरित्रे,' 'पुण्यातील जुन्या अवशेषांवरची टिपणे,' 'छोट्या शोधनोंदी,' 'व्यक्ती नोंदी,' 'व्यक्तिपरिचय' हे त्यांचे लेखनकार्य अतिशय मोलाचे आहे. महाराष्ट्रीय विद्वत्तेचा आदर्श म्हणून त्यांच्या शब्दकोशाकडे पहिले जाते. त्यांच्या कोशाचे वैशिष्ट्य म्हणजे माहितीचा अचूकपणा, मांडणीचा नेटकेपणा, सूक्ष्म संशोधन आणि अभिनिवेशरहित स्पष्ट प्रतिपादन. महाराष्ट्र साहित्य परिषदेची धुरा त्यांनी अनेक वर्षे सांभाळली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ते चिटणीस होते. भारत इतिहास संशोधक मंडळाचे कर्वे हे दहा वर्षे चिटणीस होते. अशा या थोर कोशकाराचे १६ डिसेंबर १९६० रोजी निधन झाले.

Nashik Edition

Feb 04, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401